(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

एमएएनयू/एससी/००५४/१९६७

समतुल्य उद्धरणःए.आय.आर.१९६८ऐस.सी.११७,१९६८(१६) बी.एलजेआर २७३, १९६८ क्रि.एलजे९७[१९६७] ३ ऐस सी. आर. ६६८

**भारताच्या सर्वोच्च न्यायालयात**

फौजदारी अपील क्रमांक २१८/१९६६, फौजदारी अपील क्रमांक २३८/१९६६

निर्णय दिल्याचा दिनांक: १७.०४.१९६७

**अपीलकर्ता: अभिनंदन झा आणि इतर**

**विरुद्ध**

**उत्तरवादी: दिनेश मिश्रा**

**माननीय न्यायमूर्ति /न्यायमंच:**

माननीय न्यायमूर्ति सी.ए. वैद्यलिंगम आणि माननीय न्यायमूर्ति एम. हिदायतुल्लाह.

**<u>न्यायनिर्णय</u>**

**(द्वारे) माननीय न्यायमूर्ति सी.ए. वैद्यलिंगम.**

**१.** या विशेष अनुमती फौजदारी याचिकांमध्ये, विचारात घेण्यासाठी उद्धवणारा सामान्य प्रश्न हा आहे की, एखाद्या दखलपात्र गुन्ह्याच्या तपासानंतर पोलिसांनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या (त्यानंतर संहिता म्हंटले आहे) कलम १७३ अंतर्गत अंतिम अहवाल सादर केल्यानंतर, दंडाधिकारी हे पोलिसांना दोषारोपपत्र सादर करण्याचे निर्देश देऊ शकतात का? या मुद्द्यावर भारतातील विविध उच्च न्यायालयांमध्ये मतभेद आहेत. मद्रास, कलकत्ता, मध्य प्रदेश, आसाम आणि

गुजरातच्या उच्च न्यायालयांचा असा दृष्टीकोन आहे की दंडाधिकाऱ्यांना असे कोणतेही अधिकार नाहीत, तर पाटणा आणि () उच्च न्यायालयांचा दृष्टीकोन याउलट आहे.

२. फौजदारी अपील क्रमांक २१८/१९६६ मधे, उत्तरवादी दिनेश मिश्रा याने ३ जून १९६५ रोजी राजौन पोलिस स्टेशनला प्रथम खबरी अहवाल दाखल केला, की त्याला त्याच्या घराच्या उत्तरेकडील बाजूला असलेल्या उमा कांत मिश्रा या व्यक्तीचे गवती छप्पर असलेले घर, जळताना दिसले आणि ह्यातील याचिकाकर्ते घटनास्थळावरून पळताना दिसले. पोलिसांनी तपास केला आणि संहितेच्या कलम १७३ (१) अन्वये ज्याला 'अंतिम अहवाल' म्हणतात तो सादर केला, ज्यात म्हंटले आहे की ज्या गुन्ह्याची तक्रार केली गेलेली आहे तो खोटा आहे. उपविभागीय दंडाधिकाऱ्यांना हा अहवाल १३ जुलै १९६५ रोजी मिळाला, परंतु दरम्यानच्या काळात उत्तरवादीने पोलिसांनी सादर केलेल्या अहवालाच्या खरेपणाला आव्हान देणारी 'निषेध याचिका' दाखल केली होती. दंडाधिकाऱ्यांनी पोलिस डायरी चे अवलोकन केल्याचे दिसते आणि उत्तरवादी ह्यांच्या वकिलांचे आणि सरकारी वकिलांचे म्हणणे ऐकल्यानंतर, २७ ऑक्टोबर १९६५ रोजी एक आदेश पारित केला, ज्यामध्ये पोलिसांना याचिकाकर्त्यांविरुद्ध दोषारोपपत्र दाखल करण्याचे निर्देश दिले. याचिकाकर्त्यांनी या आदेशाला, दोन्ही, सन्माननिय सत्र न्यायाधीश,भागलपूर आणि पटणा उच्च न्यायालय ह्यांच्यासमक्ष आव्हान दिले परंतु ते अपयशी ठरले. उच्च न्यायालयाने, त्याच्या, आधीच्या निर्णयानुसार असे म्हटले होते की, दंडाधिकारी, जेव्हा पोलिसांनी सादर केलेल्या अहवालाशी असहमत असतात, तेव्हा संहितेच्या कलम १७३(१)अंतर्गत दोषारोपपत्र मागविणे हे त्यांच्या अधिकारक्षेत्रात आहे. या याचिकेत याचिकाकर्त्यांनी या निर्णयाला आव्हान दिले आहे.

३. त्याचप्रमाणे फौजदारी अपील क्र.२३८/१९६६ मधील उत्तरवादी क्र.२ ने, २४ फेब्रुवारी १९६४ रोजी, पोलिस स्टेशन, मलसलामी येथे पोलिसांसमोर लेखी तक्रार दाखल केली होती की त्याची मुलगी हिरामणी २१ फेब्रुवारी १९६४ पासून बेपत्ता होती आणि अपीलातील अपीलकर्त्यांनी तिचे अपहरण केले होते. भा.द.वि. च्या कलम ३६६ अंतर्गत त्यांच्याविरुद्ध खटला नोंदविण्यात आला होता. तपासाअंती, पोलिसांनी दंडाधिकाऱ्यांना अंतिम अहवाल सादर केला की, संबंधित मुलीचा शोध लागला असून, तिने असे सांगितले की ती स्वतःच्या इच्छेने पळून गेली होती आणि म्हणून पोलीसांचे असे म्हणणे आहे की हे प्रकरण आता संपले असे समजावे.

४. उत्तरवादी क्र.२ ने पोलिसांच्या विधानांना आव्हान देत न्यायालयात 'निषेध याचिका' दाखल केली आणि त्याने भा.द.वि. च्या कलम ४९८ अंतर्गत तक्रारही दाखल केली. दंडाधिकाऱ्यांनी, पोलिसांच्या केस डायरीचा अवलोकनानंतर आणि अपीलकर्त्यांचे वकील आणि उत्तरवादी क्र.२ चे, तसेच सरकारी वकिलांचे म्हणणे ऐकल्यानंतर, तपास अधिकाऱ्याला भा.द.वि. च्या कलम ३६६ अंतर्गत आरोपी व्यक्तिंविरूद्ध दोषारोपपत्र दाखल करण्याचे निर्देश देणारा आदेश पारित केला. हा आदेश सन्माननिय सत्र न्यायाधीश तसेच पटणा उच्च न्यायालयानेही कायम केला आहे. या प्रकरणातही, पटणा उच्च न्यायालयाने, त्याच्या आधीच्या निर्णयानुसार, असा निर्णय दिला की, संबंधित आदेश पारित करणे दंडाधिकाऱ्यांच्या अधिकारक्षेत्रात आहे. या सगळ्याच आदेशांना, याचिकाकर्त्यांनी या अपील द्वारे आव्हान दिले आहे.

५. फौजदारी अपील क्र. २१८/१९६६ मध्ये, अपीलकर्त्यांच्या वतीने विद्वान वकील श्री. झा यांनी निदर्शनास आणून दिले की जेव्हा पोलिसांकडून, संहितेच्या कलम १७३(१) अंतर्गत, कोणताही गुन्हा शाबीत होत नसल्याचा अंतिम अहवाल सादर

केला जातो, तेंव्हा पोलिसांना दोषारोपपत्र दाखल करण्याचे निर्देश देणे दंडाधिकाऱ्यांच्या अधिकारक्षेत्रात नाही. पोलिसांना पुढील तपास करण्याचे निर्देश देणे किंवा उत्तरवादी क्र. २ ने दाखल केलेल्या निषेध याचिकेला तक्रार मानणे आणि गुन्ह्याची दखल घेणे आणि कायद्यानुसार पुढे जाणे हे दंडाधिकाऱ्यांसाठी स्वेच्छाधित असू शकते, असे वकिलांनी निदर्शनास आणून दिले. वकिलाने असे नमूद केले की संहितेच्या चौदाव्या प्रकरणाची योजना स्पष्टपणे सूचित करते की आरोपीला न्यायचौकशी साठी पाठवायचे की नाही याबद्दल मत हे तपास अधिकारी तयार करू शकतात आणि दंडाधिकारी पोलिसांना विशिष्ट मत तयार करण्याची आणि अशा मताच्या आधारावर अहवाल सादर करण्याची सक्ती करू शकत नाही. या प्रकरणात, उत्तरवादी क्र. २ ने दाखल केलेली निषेध याचिका तक्रार मानली गेली आहे हे दर्शविण्यासाठी काहीही पुरावा नाही, अशा परिस्थितीत दंडाधिकाऱ्यांना गुन्ह्याची दखल घेणे स्वेच्छाधित असू शकते, परंतु, वकिलांनुसार अशी कोणतीही प्रक्रिया अवलंबलेली नसल्याने, दंडाधिकाऱ्यांनी दोषारोपपत्र दाखल करण्याचे निर्देश दिलेला आदेश बेकायदेशीर आहे आणि संहितेच्या तरतुदींप्रमाणे खात्रीलायक नाही. हे युक्तिवाद अपीलकर्त्यांच्या वतीने श्री. नुरुद्दीन अहमद यांनी फौजदारी अपील क्र. २३८/१९६६ मध्ये त्याचा अवलंब करत पुनरुच्चार केला आहे.

**६.** गुजरात उच्च न्यायालयाने आपल्या पूर्ण खंडपीठाच्या ए.आय.आर. (AIR) १९६६ गुज. २८३ मध्ये प्रदर्शित, गुजरात राज्य विरुद्ध शाह लखमशी एमएएनयू/ जी.जे./ ००६४/ १९६६, निकालात व्यक्त केलेले मत मान्य करण्यासाठी दोन्ही विद्वान वकिलांनी आम्हाला याचना केली. तर दुसरीकडे, श्री. यू. पी. सिंग, उत्तरवादीचे विद्वान वकील यांनी फौजदारी अपील क्र. २१८/१९६६ मध्ये असे निदर्शनास आणून दिले आहे की दंडाधिकाऱ्यांना, योग्य प्रकरणांमध्ये, पोलिसांनी सादर केलेल्या अंतिम अहवालाशी सहमत नसल्यास त्यांना दोषारोपपत्र सादर करण्याचे निर्देश देणे त्यांच्या

अधिकारक्षेत्रात असते. अन्यथा, वकील निदर्शनास आणून देतात की, स्थिती अशी असेल की, संपूर्ण प्रकरण पोलिस अधिकाऱ्यांच्या विवेकबुद्धीवर सोडले जाईल, पोलिसांची कारवाई योग्य नाही असे वाटत असले तरी न्यायालये हतबल होतील. साहजिकच, वकील याचना करतात की एमएएनयू/ डब्ल्यू.बी./००४०/१९६२:ए.आय.आर.१९६२सी.ए.एल.१३५ मध्ये प्रदर्शित ए.के.रॉय विरुद्ध स्टेट ऑफ डब्ल्यू.बी. मधील न्यायमूर्ती जे या मताशी सहमत नाही ह्यांनी व्यक्त केलेली मते आणि मुंबई आणि पटणा उच्च न्यायालयांनी अनुक्रमे एमएएनयू/ एम.एच./००८८/ १९६० : ए.आय.आर.१९६० बी.ओ.एम.२४०, मध्ये प्रदर्शित राज्य विरुद्द मुरलीधर गोवर्धन आणि एमएएनयू/बी.एच./०१०३/१९६६: ए.आय.आर.१९६६ पी. ए. टी ४३८ मध्ये प्रदर्शित राम नंदन विरुद्ध राज्य, मध्ये दिलेले निर्णय, स्वीकारले जावेत.

**७.** गुन्ह्यांच्या तपासाच्या बाबतीत पोलिसांची कर्तव्ये, तसेच त्यांच्या अधिकारांचे योग्य प्रकारे आकलन करण्यासाठी, आवश्यक असल्यास संहितेच्या चौदाव्या प्रकरणातील तरतुदींचा संदर्भ घेतला जाऊ शकतो. हे प्रकरण 'पोलिसांना माहिती आणि तपास करण्याचे त्यांचे अधिकार' यांच्याशी संबंधित आहे आणि त्यात कलम १५४ पासून सुरुवात होऊन कलम १७६ पर्यंत समाप्त होणाऱ्या कलमांचा समूह आहे. कलम १५४ हे दखलपात्र गुन्ह्याशी संबंधित माहिती आणि त्या संदर्भात स्वीकारली जाणारी कार्यपद्धती यांच्याशी संबंधित आहे. त्याचप्रमाणे, कलम १५५ अदखलपात्र गुन्ह्यांच्या संदर्भात माहितीशी संबंधित आहे. या कलमांतर्गत उप-कलम(२) पोलीस अधिकाऱ्याला दंडाधिकाऱ्यांच्या आदेशाशिवाय अदखलपात्र प्रकरणाचा तपास करण्यास मनाई आहे. कलम १५६ पोलीस स्टेशनचे प्रभारी असलेल्या पोलीस अधिकाऱ्याला दंडाधिकाऱ्यांच्या आदेशा शिवाय कोणत्याही दखलपात्र प्रकरणाचा तपास करण्यास अधिकार प्रदान करते. त्यामुळे हे दिसून येईल की, दखलपात्र

गुन्ह्याच्या तपासाच्या बाबतीत पोलिसांना मोठ्या प्रमाणात अधिकार बहाल केले आहेत. कलम १५६ उप-कलम(३), प्रमाणे कलम १९० अंतर्गत अधिकार असलेला कोणतेही दंडाधिकारी अन्वेषणाचे आदेश देऊ शकतात. एखाद्या दखलपात्र गुन्ह्याचा संशय असलेल्या प्रकरणांमध्ये पोलिस स्टेशनचे प्रभारी अधिकारी, दंडाधिकाऱ्यांना अहवाल पाठवल्यानंतर, कलम १५७ अंतर्गत, वस्तुस्थिती आणि परिस्थितीची चौकशी करण्यासाठी पात्र असतो, तसेच तो गुन्हेगाराला शोधून काढण्यासाठी आणि अटक करण्यासाठी पावले उचलू शकतो.

कलम १५७ (१) मधील तरतुदीतील खंड(ब) मध्ये पोलिस अधिकाऱ्याला, तपासासाठी पुरेसा आधार नसल्याचे दिसून आल्यास, या प्रकरणाचा तपास न करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. कलम १५८ हा कलम १५७ अंतर्गत पाठवल्या जाणाऱ्या अहवालाच्या बाबतीत अवलंबल्या जाणाऱ्या प्रक्रियेशी संबंधित आहे. कलम १५९ नुसार दंडाधिकाऱ्यांना, कलम १५७ अन्वये, अहवाल प्राप्त झाल्यानंतर एकतर चौकशीचे निर्देश देण्याचा किंवा स्वत: किंवा त्याच्या अधीनस्थ अन्य दंडाधिकाऱ्यांमार्फत या प्रकरणाची प्राथमिक चौकशी करण्याचे किंवा प्रकरण निकाली काढण्याचे अधिकार दिले आहेत. कलम १६० ते १६३ हे साक्षीदारांची उपस्थिती आवश्यक करण्याच्या, साक्षीदारांची तपासणी करण्याच्या आणि विधाने नोंदवण्याच्या पोलिसांच्या अधिकाराशी संबंधित आहेत. कलम १६५ आणि १६६ मध्ये तपासादरम्यान आणि त्यात नमूद केलेल्या परिस्थितीत पोलिस अधिकाऱ्यांच्या शोध मोहिमे संदर्भात अधिकारांचा उल्लेख आहे. कलम १६७ मध्ये २४ तासांत तपास पूर्ण करता येत नसल्यास पोलिसांनी कोणती प्रक्रिया अवलंबावी, ह्याबद्दलची तरतूद आहे. कलम १६८ मध्ये चौदाव्या प्रकारणांतर्गत एखाद्या कनिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने असा तपास केला असेल तर तपासाच्या परिणामाचा अहवाल पोलिस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याला पाठविण्याची तरतूद आहे. कलम १६९ नुसार, बंधपत्राची अंमलबजावणी केल्यावर, पोलिस अधिकाऱ्याला एखाद्या व्यक्तीला कोठडीतून

सोडण्याचा अधिकार देण्यात आला आहे, जेव्हा चौदाव्या प्रकरणाअंतर्गत तपास केल्यावर पोलिस स्टेशनच्या प्रभारी अधिकाऱ्याला किंवा तपास करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्याला पुरेसे पुरावे किंवा संशयाचे वाजवी कारण नाही असे आढल्यास, अशा प्रकरणांमध्ये आरोपीला दंडाधिकाऱ्यापुढे पाठवण्याचे समर्थन करण्यासाठी, गरज पडल्यास दंडाधिकाऱ्यांसमोर हजर राहण्याचा अधिकार देण्यात आला आहे. कलम १७० नुसार चौदाव्या प्रकरणा अंतर्गत तपासनंतर पोलिस स्टेशनच्या प्रभारी अधिकाऱ्याला जर पुरेसे पुरावे असल्याचे दिसून आल्यास कोठडीत असलेल्या आरोपीला सक्षम दंडाधिकाऱ्यांकडे पाठविण्याचा किंवा गुन्हा जामीनपात्र असेल तर दंडाधिकाऱ्यांसमोर हजर राहण्यासाठी आरोपीकडून जमानत घेण्याचा अधिकार आहे. कलम १७२ पोलीस अधिकाऱ्याला तपास करताना, त्या कलमात दर्शविलेल्या पद्धतीने, विविध तपशीलांची नोंद असलेली डायरी ठेवणे बंधनकारक करते, कलम १७३ मध्ये चौदाव्या प्रकरणाअंतर्गत अनावश्यक विलंब न करता तपास पूर्ण करण्याची तरतूद आहे आणि पोलीस स्टेशन चे प्रभारी असलेल्या अधिकाऱ्याला त्यात तरतूद केलेल्या पद्धतीने, आवश्यक तपशील असलेला अहवाल संबंधित दंडाधिकाऱ्यांना पाठवणे बंधनकारक आहे.

८. चौकशी आणि संपरीक्षे बद्दल फौजदारी न्यायालयांच्या अधिकारक्षेत्राशी संबंधित, पंधराव्या प्रकरणात येणाऱ्या १९० चा संदर्भ घेणे आता आवश्यक आहे. ते कलम 'कार्यवाही सुरू करण्यासाठी आवश्यक अटी' आणि त्याच्या उप-कलम (१) खाली आढळेल ते खालीलप्रमाणे आहेः

"(१) यापुढे तरतूद केल्याखेरीज, कोणतेही अध्यक्षीय दंडाधिकारी, जिल्हा दंडाधिकारी किंवा उपविभागीय दंडाधिकारी आणि या संदर्भात विशेष अधिकार असलेले इतर कोणतेही दंडाधिकारी कोणत्याही गुन्ह्याची दखल घेऊ शकतात -

(अ) असा गुन्हा ठरणाऱ्या तथ्यांची तक्रार प्राप्त झाल्यावर;

(ब) कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याने केलेल्या अशा तथ्यांच्या लेखी अहवालाच्या आधारे;

(क) अधिकाऱ्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीकडून प्राप्त झालेल्या माहितीवर किंवा अशा प्रकारचा गुन्हा करण्यात आल्याचे त्याच्या स्वतःच्या माहितीवर किंवा संशयावर.

९. चौदाव्या प्रकरणात येणाऱ्या पूर्वगामी कलमांवरून असे दिसून येईल की, नोंदवलेल्या गुन्ह्याचा तपास होईल आणि आरोपीला कोणताही त्रास न देता कायद्याच्या मर्यादेत तपास केला जाईल आणि अनावश्यक विलंब न करता तो पूर्ण केला जाईल हे सुनिश्चित करण्यासाठी अतिशय विस्तृत तरतुदी करण्यात आल्या आहेत. परंतु लक्षात घेण्याजोगा मुद्दा असा आहे की तपास करण्याची पद्धत आणि प्रकार पूर्णपणे पोलिसांवर सोडली जाते आणि दंडाधिकाऱ्यांना, जे आपल्याला दिसते त्यावरून, यापैकी कोणत्याही तरतुदींनुसार त्यात हस्तक्षेप करण्याचा कोणताही अधिकार नाही. तपासात, पोलीस स्टेशनचा प्रभारी अधिकारी किंवा तपास करणाऱ्या अधिकाऱ्याला असे दिसले की आरोपीला दंडाधिकाऱ्यांसमक्ष पाठविण्याचे समर्थन करणारा पुरेसा पुरावा किंवा संशयाची वाजवी कारणे नाहीत, तर कलम १६९ अंतर्गत असा तपास करणारा अधिकारी, दंडाधिकाऱ्यांसमोर हजर राहण्यासाठी बंधपत्राची अंमलबजावणी केल्यावर आरोपीला, कोठडीत असल्यास, सोडेल. त्याचप्रमाणे, दुसरीकडे, पोलीस स्टेशनचा प्रभारी अधिकारी किंवा चौदाव्या प्रकरणाअंतर्गत, तपास करणाऱ्या अधिकाऱ्याला, आरोपीला दंडाधिकाऱ्याकडे पाठविण्याचे समर्थन करण्यासाठी पुरेसा पुरावा किंवा वाजवी आधार आहे असे दिसल्यास, अशा अधिकाऱ्याला, कलम १७० अंतर्गत, आरोपीला दंडाधिकाऱ्याकडे पाठवणे किंवा, जर गुन्हा जामीनपात्र असेल तर, अशा दंडाधिकाऱ्यांसमोर हजर राहण्यासाठी

त्याच्याकडून जामीन घेणे आवश्यक आहे. परंतु, एखादा खटला संहितेच्या कलम १६९ अंतर्गत येवो किंवा संहितेच्या कलम १७० अंतर्गत, तपास पूर्ण झाल्यावर, पोलीस अधिकाऱ्याला कलम १७३ अंतर्गत, त्यात दर्शविलेल्या पद्धतीने, विविध तपशील सह दंडाधिकाऱ्यांकडे अहवाल सादर करावा लागतो. कलम १७३ अंतर्गत अहवाल मिळाल्यावर पोलिसांना दोषारोपपत्र दाखल करण्याचे निर्देश देण्याचा अधिकार दंडाधिकाऱ्यांना मिळाला आहे का, हा प्रश्न अहवाल प्राप्त झाल्यावर दंडाधिकाऱ्यांनी वापरलेल्या अधिकारक्षेत्राच्या स्वरूपावर खरोखर अवलंबून असते.

**१०.** या संदर्भात, आपण राजा सम्राट वि. ख्वाजा नझीर अहमद एल आर ७११ अ.२०३ मध्ये न्यायिक समितीने केलेल्या काही निरीक्षणांचा संदर्भ घेऊ शकतो आणि या न्यायालयाद्वारे, एच. एन. रिशबुद आणि इंदर सिंग विरुद्ध दिल्ली राज्य (१९५५) १ एस सी आर.११५. नाझीर अहमदचा खटला एल आर ७११ अ. मध्ये लॉर्ड पोर्टरने, २१२ वर, खालीलप्रमाणे निरीक्षण केलेः

"ज्याप्रमाणे एखाद्या गुन्ह्यातील प्रत्येक आरोपीला न्यायालयामध्ये मुक्त प्रवेश मिळणे आवश्यक आहे, जेणेकरून त्याच्यावर ज्या गुन्ह्याचा आरोप आहे त्या गुन्ह्यात तो दोषी आढळला नाही तर त्याची निर्दोष मुक्तता होऊ शकेल, त्याचप्रमाणे न्यायव्यवस्थेने पोलिसांच्या बाबतीत त्यांचा प्रांत आणि ज्यामध्ये कायदा त्यांच्यावर चौकशीचे कर्तव्य लादतो, ह्यामध्ये हस्तक्षेप करू नये हे अत्यंत महत्त्वाचे आहे. भारतात दाखवल्याप्रमाणे, न्यायालयीन अधिकाऱ्यांकडून कोणत्याही परवानगी न घेता कथित दखलपात्र गुन्ह्याच्या परिस्थितीचा तपास करण्याचा पोलिसांचा वैधानिक अधिकार आहे आणि न्यायालयाच्या अंतर्निहित अधिकारक्षेत्राचा वापर करून त्या वैधानिक अधिकारांमध्ये हस्तक्षेप करणे शक्य असल्यास ते दुर्दैवी परिणाम असल्याचे त्यांच्या न्यायधिशांना वाटते. न्यायपालिका आणि पोलिसांची कार्ये परस्पर व्याप्त नसून पूरक आहेत आणि कायदा आणि सुव्यवस्थेचे योग्य पालन करून वैयक्तिक स्वातंत्र्याचे

संयोजन केवळ प्रत्येकाला त्याचे स्वतःचे कार्य करण्यास सोडल्यानंतरच प्राप्त केले जाऊ शकते, अर्थात, गुन्हेगारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४९१ अन्वये हेबियस कॉर्पसच्या स्वरूपात निर्देश देण्याकरिता योग्य प्रकरणात हस्तक्षेप करण्याच्या न्यायालयाच्या अधिकाराच्या अधीन राहून. तथापि, सध्याच्या परिस्थितीत, जेव्हा न्यायालयासमोर आरोप दाखल केला जातो तेव्हा न्यायालयाची कार्ये सुरू होतात तोपर्यंत नाही ".

**११.** ही निरीक्षणे या न्यायालयाने मान्यतेने, पश्चिम बंगाल राज्य वि. एन. बसाक एम.ए.एन.यू/ऐस.सी/०११४/१९६२:[१९६३]२ऐस.सी.आर ५२. हे न्यायालय एम.ए.एन.यू/ऐस.सी/००४९/१९५४ :१९५५ क्री.ल.जे.५२६, मधील ऋषबुड आणि इंदर सिंग प्रकरणातील निरीक्षण करते, पृ. ११५६, खालीलप्रमाणे:
"तपास सहसा, ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याला दिलेल्या आणि संहितेच्या कलम १५४ अंतर्गत नोंदवलेल्या, गुन्ह्याशी संबंधित माहितीवर सुरू होतो. अशा प्रकारे मिळालेल्या माहितीवरून किंवा अन्यथा, पोलीस स्टेशनच्या प्रभारी अधिकाऱ्याला एखाद्या गुन्ह्याचा संशय येण्याचे कारण असल्यास, त्याला किंवा त्याने प्रतिनियुक्त केलेल्या अधीनस्थ अधिकाऱ्याला प्रकरणाची वस्तुस्थिती आणि परिस्थिती तपासण्यासाठी आणि गुन्हेगाराला शोधण्यासाठी आणि अटक करण्यासाठी आवश्यक असल्यास उपाययोजना करण्यासाठी घटनास्थळी जावे लागते. अशा प्रकारे तपासात प्रामुख्याने तथ्यांचा शोध घेणे आणि प्रकरणाची परिस्थिती व्याख्येनुसार, त्यात 'पोलीस अधिकाऱ्याने केलेल्या पुराव्यांच्या संकलनासाठी संहितेखालील सर्व कार्यवाही' समाविष्ट आहे.

**१२.** पुन्हा, संहितेच्या चौदाव्या प्रकरणातील काही तरतुदींच्या संदर्भानंतर, ते पृ.११५७ वर उल्लेखित आहे की:

"अशा प्रकारे, संहिते अंतर्गत अन्वेषणाच्या सामान्यतः खालील टप्पे असतातः(१) घटनास्थळी जाणे, (२) प्रकरणाची वस्तुस्थिती आणि परिस्थितीची खात्री करणे, (३) संशयित गुन्हेगाराला शोधून काढणे आणि अटक करणे, (४) गुन्ह्याशी संबंधित पुरावे गोळा करणे ज्यामध्ये (अ) विविध व्यक्तिंची (आरोपींसह) तपासणी करणे आणि अधिकाऱ्याला योग्य वाटल्यास त्यांची निवेदने लिहून घेणे.(ब) तपासासाठी आणि खटल्यात सादर करण्यासाठी आवश्यक मानल्या जाणाऱ्या वस्तू जप्त करण्याच्या ठिकाणांची झडती घेणे आणि (५) गोळा झालेला पुरावा आरोपीला न्यायदंडाधिकाऱ्यासमोर उभे करण्यासाठी पुरेसा आहे किंवा नाही ह्याबद्दल मत तयार करणे आणि तसे असल्यास कलम १७३ अंतर्गत दोषारोपपत्र  दाखल करून त्यासाठी आवश्यक पावले उचलणे. .... हे देखील स्पष्ट आहे की तपासाचा अंतिम टप्पा म्हणजे, आरोपीवर खटला चालवायचा आहे की नाही याबद्दल मत हे पोलीस स्टेशनच्या प्रभारी अधिकाऱ्याने तयार करावयाचे  आहे".

**१३.** चौदाव्या प्रकरणाची योजना स्पष्टपणे दर्शवते की आरोपीला न्यायचौकशी साठी पाठविणासाठीचा गुन्हा शाबीत होतो की नाही याबद्दल मत तयार करणे हे पोलिस स्टेशनच्या प्रभारी अधिकाऱ्यावर सोडले गेले आहे यावर जोर देण्याच्या उद्देशाने आम्ही या निरीक्षणांचा संदर्भ देत आहोत. वर नमूद केलेली ही तत्त्वे लक्षात घेऊन, या प्रकरणात विचार करण्यासाठी निर्माण झालेल्या प्रश्नावर आपण विचार केला पाहिजे. अशा परिस्थितीत पोलिसांना दोषारोपपत्र दाखल करण्यासाठी सांगण्याचा अधिकार दंडाधिकाऱ्यांना नसल्याचा निर्वाळा देणाऱ्या उच्च न्यायालयांनी आपला निर्णय दोन तत्त्वांवर दिला आहे. (अ) दंडाधिकाऱ्यांना असा निर्णय पारित करण्याचा अधिकार देणारी कोणतीही स्पष्ट तरतूद संहितेत नाही आणि (ब) चौदाव्या प्रकरणाची योजना लक्षात घेता,एम.ए.एन.यू /टी. एन./ ००६१ /१९३२ : ए.आय.आर.१९३२ एम.ए.डी. ६७३ मधील - वेंकट सुभा विरुद्ध अंजनयुलु, एम. ए.

एन. यू /जी. एच.  /००५१/१९५३:. ए.आय.आर.१९५३  एस ११२ मधील अब्दुल रहीम विरुद्ध अब्दुल मुक्तादीन, एम. ए. एन. यू./एम. पी./००७/१९६०: ए.आय.आर. १९६० एम. पी. १२ मधील अमर प्रेमानंद वि. राज्य,  एम. ए. एन. यू./डब्ल्यू. बी./००४०/१९६२: ए.आय.आर. १९६२ सी. ए. एल.  १३५;  मधील  ए. के. रॉय विरुद्ध  डब्ल्यू. बी. राज्य  मधील बहुमत दृश्यः, एम. ए. एन. यू/जी. जे./००६४ /१९६६: ए.आय.आर. १९६६ जी.यु.जे.२८३ मधील गुजरात राज्य विरुद्ध शाह लखमशी, चा संदर्भाने अशा अधिकाराचा अंदाज लावला जाऊ शकत नाही. दुसरीकडे, ज्या उच्च न्यायालयांनी अशा अधिकाराला मान्यता दिली आहे, त्यांनी त्यांचा निर्णय पुन्हा दोन कारणांवर आधारित केला आहे ते म्हणजे (अ) जेव्हा तपासानंतर, पोलिसांकडून अहवाल सादर केला जातो, तेव्हा दंडाधिकाऱ्यांना तो न्यायालयीनदृष्ट्या हाताळावा लागतो, ज्याचा अर्थ असा होईल की जेव्हा अहवाल स्वीकारला जात नाही, तेव्हा दंडाधिकारी पोलिसांना योग्य निर्देश देऊ शकतात; आणि (ब) दंडाधिकाऱ्यांना पोलिसांच्या तपास प्रक्रियेवर पर्यवेक्षी अधिकार दिला जातो आणि म्हणूनच, एम. ए. एन. यू. /एम. एच./ ००८८/१९६०: ए. आय. आर. १९६० बी. ओ. एम.२४० मधील -राज्य वि. मुरलीधर गोवर्धन  आणि एम. ए. एन. यू./बी. एच./०१०३/१९६६: ए. आय. आर. १९६६ पी. ए. टी.४३८ मधील राम नंदन विरुद्ध राज्य, चा संदर्भाने, दंडाधिकाऱ्यांच्या अशा अधिकाराला मान्यता दिली जाऊ शकते.

**१४.** जरी असे असू शकते की पोलिसांनी सादर केलेला अहवाल दंडाधिकाऱ्यांद्वारे न्यायालयीन पद्धतीने हाताळला जाऊ शकतो आणि जरी दंडाधिकाऱ्यांना काही पर्यवेक्षी अधिकार असू शकतात, तरीही आम्ही पुढील दृष्टिकोनाशी सहमत होण्यास इच्छुक नाही की केवळ या बाबींवरून असे म्हटले जाऊ शकते की जेव्हा पोलिसांकडून एखाद्या आरोपीला न्यायचौकशीसाठी पाठवण्यासाठी, आरोपीविरुद्ध

गुन्हा शाबीत होत नाही असा अहवाल सादर केला जातो तेव्हा तो दंडाधिकाऱ्यांनी, पोलीसांना दोषारोपपत्र दाखल करण्याचे निर्देश देण्यास खुला असतो. परंतु, आम्ही हे स्पष्ट करू शकतो की याचा अर्थ असा नाही की दंडाधिकारी पूर्णपणे अधिकारहीन आहेत, कारण, नंतर सूचित केल्याप्रमाणे, एखाद्या गुन्ह्याची दखल घेणे आणि कायद्यानुसार कारवाई करणे त्यांच्यासाठी स्वेच्छातीत आहे. आम्हाला वर नमूद केलेल्या काही निर्णयांमध्ये, अनुमान लावण्याचा प्रयत्न केल्याप्रमाणे, कलम १७३(३) अंतर्गत असे  कोणतेही अधिकार आढळत नाही. वेगवेगळ्या निष्कर्षांवर पोहोचण्यासाठी विविध उच्च न्यायालयांनी घेतलेला दृष्टीकोन आम्ही व्यापकपणे सूचित केला आहे, त्यामुळे त्या निर्णयांचा तपशीलवार संदर्भ घेणे आवश्यक आहे असे आम्हाला वाटत नाही.

**१५.** असे दिसून येईल की संहितेमध्ये, 'दोषारोपपत्र' किंवा 'अंतिम अहवाल' ही अभिव्यक्ती वापरली गेलेली नाही. परंतु असे समजले जाते की, नियम आणि विनियम असलेल्या पोलीस नियमावलीमध्ये पोलिसांनी संहितेच्या कलम १७० च्या अंतर्गत दाखल केलेल्या अहवालाला 'दोषारोपपत्र' म्हणून संबोधले जाते. परंतु कलम १६९ अंतर्गत पाठवलेल्या अहवालांच्या संदर्भात, म्हणजेच, जेव्हा आरोपीला दंडाधिकाऱ्याकडे पाठविण्याचे समर्थन करण्यासाठी पुरेसा पुरावा नसतो, तेव्हा त्याला वेगवेगळ्या राज्यांमध्ये वेगवेगळ्या प्रकारे म्हणजे एकतर 'संदर्भित दोषारोप', 'अंतिम अहवाल' किंवा 'सारांश' म्हणून, संबोधले जाते.

**१६.** बिहार राज्यातील या दोन अपीलांमध्ये, कलम १६९ अंतर्गत अहवालांना 'अंतिम अहवाल' म्हणून संबोधले गेले आहे. आता, कलम १७३ च्या अंतर्गत, अहवाल प्राप्त झाल्यावर दंडाधिकाऱ्यांनी नेमके काय करावे असा प्रश्न विचारात घ्यावा लागेल. तो अहवाल कलम १७० अंतर्गत येणाऱ्या प्रकरणाच्या संदर्भात असू

शकतो किंवा कलम १६९ च्या अंतर्गत येणारा. आपण आधीच कलम १९० चा संदर्भ घेतला आहे. हा 'कार्यवाही सुरू करण्यासाठी आवश्यक अटी' या शीर्षकाच्या कलमांच्या गटातील पहिला कलम आहे. या कलमांतर्गत उप-कलम (१) प्रमाणे कलम १७३ अंतर्गत पाठवलेल्या अहवालाचा समावेश असेल. कलम १९० च्या उप-कलम (१) मध्ये वापरल्या गेलेले 'कोणत्याही गुन्ह्याची दखल घेऊ शकते', शब्दांचा अर्थ, आमच्या मते 'न्यायिक विवेकबुद्धी' चा वापर करणे असा होईल आणि कलम १७३ अंतर्गत अहवाल प्राप्त करणाऱ्या दंडाधिकाऱ्याला या अहवालाचा विचार करून गुन्ह्याची दखल घ्यावी की नाही याचा निर्णय न्यायालयीन पद्धतीने घ्यावा लागेल. यावरून असे दिसून येते की, आरोपीविरुद्ध खटला चालविण्याच्या पोलिसांचे मत स्वीकारण्यास दंडाधिकारी बांधील आहेत असे नाही. अहवालात उघड झालेली तथ्ये गुन्ह्याची दखल घेण्याइतकी गंभीर नाही किंवा एखाद्या आरोपीविरुद्ध खटला चालविण्याचे समर्थन करावे इतके पुरेसे पुरावे नाहीत, असे मत दंडाधिकारी घेऊ शकतात. यापैकी कोणत्याही कारणास्तव, दंडाधिकाऱ्यांनी, पोलिसांच्या मताची पर्वा न करता, एखाद्या गुन्ह्याची दखल घेण्यास नकार देणे, पूर्णपणे न्याय्य ठरेल. दुसरीकडे, दंडाधिकारी जर पोलिसांनी सादर केलेल्या दोषारोपपत्राच्या अहवालाशी सहमत असतील, तर कोणतीही अडचण उद्भवत नाही, कारण त्याची दखल घेणे संहितेच्या कलम १९०(१) (ब) अंतर्गत पूर्णपणे त्यांच्या अधिकारक्षेत्रात असेल. कलम १७३ अन्वये आलेला अहवाल 'दोषारोपपत्र' असल्यास अशी स्थिती असेल.

**१७.** मग प्रश्न असा आहे की, दंडाधिकारी जेव्हा कलम १७३ च्या अंतर्गत पोलिसांनी सादर केलेल्या अहवालाचा विचार करतात, ज्यामध्ये, आरोपीला न्यायचौकशीसाठी पाठवण्यासाठी आरोपीविरुद्ध गुन्हा शाबीत होत नाही असे सादर केले आहे आणि आम्ही आधीच सूचित केल्याप्रमाणे, त्या अहवालाला संबंधित भागात 'अंतिम अहवाल' म्हटले जाते स्थिती कशी असेल? त्या प्रकरणांमध्येही,

दंडाधिकारी जर उक्त अहवालाशी सहमत असतील, तर ते अंतिम अहवाल स्वीकारू शकतात आणि कार्यवाही बंद करू शकतात. परंतु अशी काही उदाहरणे असू शकतात जेव्हा दंडाधिकारी अंतिम अहवालाचा विचार करून असे मत बनवू शकतात की पोलिसांनी तयार केलेले मत पूर्ण आणि संपूर्ण तपासावर आधारित नाही, अशा परिस्थितीत, आमच्या मते, कलम १५६(३) च्या अंतर्गत पोलिसांना पुढील तपास करण्यासाठी निर्देश देणे दंडाधिकाऱ्यांच्या अधिकारक्षेत्रात असेल. म्हणजेच, अंतिम अहवालाचा विचार केल्यानंतर, तपास असमाधानकारक किंवा अपूर्ण आहे किंवा पुढील तपासाला वाव आहे असे दंडाधिकाऱ्यांना वाटत असेल, तर दंडाधिकारी अंतिम अहवाल स्वीकारण्यास नकार देऊ शकतात आणि कलम १५६(३) अंतर्गत, पोलिसांना पुढील तपास करण्याचे निर्देश देऊ शकतात. अशा पुढील तपासानंतर, पोलीस, जसा तपास झालेला असेल त्यावरून, दोषारोपपत्र सादर करू शकतात किंवा पुन्हा अंतिम अहवाल सादर करू शकतात. जर शेवटी, दंडाधिकारी असे मत मांडतात की अंतिम अहवालात नमूद केलेली तथ्ये गुन्हा ठरतात, तर पोलिसांनी अंतिम अहवालात व्यक्त केलेले मतकाहीही असेल तरीही, कलम १९० (१) (सी) अंतर्गत, दंडाधिकारी, गुन्ह्याची दखल घेऊ शकतात.

**१८.** या संदर्भात, संहितेच्या कलम १६९ च्या तरतुदी समर्पक आहेत. ते विशेषतः अशी तरतूद करतात की, तपासात, पोलिस अधिकारी किंवा इतर तपासी अधिकाऱ्याचे जरी असे मत असले की आरोपीविरुद्ध कारवाई करण्यासारखा गुन्हा नाही, तरी आरोपीची सुटका करताना आवश्यक असल्यास दंडाधिकाऱ्यांसमोर हजर राहण्यासाठी त्याच्याकडून बंधपत्र घेण्यास ते बांधील आहेत. हे स्पष्ट आहे की, दंडाधिकारी जेव्हा तपास अधिकाऱ्याच्या अहवालाचा विचार करतात आणि न्यायालयीन दृष्टिकोनातून पोलिसांपेक्षा वेगळा दृष्टिकोन बाळगतात, तेव्हा दंडाधिकाऱ्यांची आकस्मिक परिस्थिती संबोधित करण्यासाठी ही तरतूद आहे.

१९.	वर नमूद केलेल्या परिस्थितीच्या अनुषंगाने या प्रकरणात विचारार्थ निर्माण होणाऱ्या प्रश्नाचा विचार आपण करायला हवा. आम्ही आधीच चौदाव्या प्रकरणाच्या योजनेचा, तसेच एम.ए.एन.यू./एस.सी./००४९/१९५४:१९५५ करी.एल.जे.५२६ मधील रिशबुद आणि इंदर सिंग ह्या प्रकरणातील या न्यायालयाच्या निरीक्षणांचा संदर्भ दिला आहे, ज्यात म्हटले की, दंडाधिकाऱ्यांसमोर आरोपीला न्यायचौकशी साठी पाठविणासाठीचा गुन्हा शाबीत होतो की नाही याबाबत मत तयार करणे हे ठाण्याचे प्रभारी अधिकाऱ्यावर सोडले आहे. आपण पाहतो त्याप्रमाणे, कोणताही असा व्यक्त अधिकार नाही, जो टीकेखाली आलेल्या प्रकरणा प्रमाणे आदेश पारित करण्याचे अधिकार देते; असे कोणतेही अधिकार निहित केले जाऊ शकत नाहीत. दंडाधिकारी पोलिसांनी तयार केलेल्या मताशी सहमत नसल्यास, त्यांच्यावर, अहवाल स्वीकारण्याचे बंधन निश्चितच नाही. अशा परिस्थितीत, जर त्यांना अजूनही असा संशय असेल की एखादा गुन्हा करण्यात आला आहे, तर पोलिसांनी अंतिम अहवालात व्यक्त केलेले मत कुठलेही असेल तरीही, कलम १९०(१) (सी) अंतर्गत गुन्ह्याची दखल घेण्याचा दंडाधिकाऱ्याना अधिकार आहे. आमच्या मते, या तरतुदीचा असा स्पष्ट हेतू आहे की, गुन्ह्याला शिक्षा झाली नाही असे होऊ नये आणि वैयक्तिकरित्या व्यथित व्यक्ती खटला चालवण्यास इच्छुक नसतील किंवा असक्षम असतील, किंवा, पोलीस, एकतर हेतुपुरस्सर किंवा प्रामाणिक चुकांमुळे, गुन्हा घडविणारी तथ्ये मांडणारा अहवाल सादर करण्यात अयशस्वी ठरतील, तरीही न्याय मिळू शकेल. त्यामुळे दंडाधिकाऱ्याला एखाद्या गुन्ह्याची दखल घेण्याचा अतिशय व्यापक अधिकार दिला आहे, केवळ जेव्हा त्याला तिसऱ्या व्यक्तीकडून गुन्हा केल्याची माहिती मिळते तेव्हाच नाही, तर जिथे त्याला माहिती असते किंवा गुन्हा झाला आहे असा संशयही असतो. कलम १९०(१)(सी) अंतर्गत दंडाधिकारी गुन्ह्याची दखल पुढील आधारावर घेऊ शकतात: अंतिम अहवाल आणि त्यांच्या समोर

ठेवलेल्या पोलिस नोंदींचा योग्य विचार केल्यानंतर आणि त्यांना संशय येण्याचे कारण आहे की गुन्हा केला गेला आहे. या परिस्थितीमुळे दंडाधिकाऱ्यांनी अंतिम अहवाल सादर केल्यावर पोलिसांकडून दोषारोपपत्र मागवण्याचा अधिकारही स्पष्टपणे नाकारला जाईल. चौदाव्या प्रकरणाची संपूर्ण योजना स्पष्टपणे सूचित करते की आरोपीविरुद्ध खटला उभा राहू शकतो की नाही याबद्दल मत हे पोलीस स्टेशन चे प्रभारी अधिकारी तयार करतो आणि ते मत हे ठरवते की अहवाल कलम १७० अंतर्गत, 'दोषारोपपत्र' आहे की कलम १६९ अंतर्गत 'अंतिम अहवाल'. आम्ही आधीच नमूद केल्याप्रमाणे, यात शंका नाही की दंडाधिकाऱ्यांनी पोलिसांचे मत मान्य करणे किंवा त्यांच्याशी असहमत असणे आणि जर ते असहमत असतील, तर आम्ही सूचित केलेल्या कोणत्याही एका मार्गाचा अवलंब करण्याचा त्यांना अधिकार आहे. परंतु तो पोलिसांना दोषारोपपत्र सादर करण्याचे निर्देश देऊ शकत नाही, कारण अहवाल सादर करणे हे दंडाधिकाऱ्यांच्या मतावर नव्हे तर पोलिसांनी तयार केलेल्या मतावर अवलंबून असते. दंडाधिकारी पोलिसांना तपासावर विशिष्ट मत तयार करण्यास आणि अशा मतानुसार अहवाल सादर करण्यास भाग पाडू शकत नाहीत. ते खरोखरच पोलिसांच्या कार्यक्षेत्रावर अतिक्रमण करणारे असेल आणि दंडाधिकाऱ्यांच्या निर्णयानुसार पोलिसांना मत तयार करण्यास भाग पाडेल आणि निर्णयाच्या स्वरूपानुसार कलम १६९ किंवा कलम १७० अन्वये अहवाल पाठविण्यास पोलिसांना भाग पाडेल. संहितेनुसार असे काम पोलिसांवर सोपवण्यात आले आहे.

**२०.** आम्ही आधीच निदर्शनास आणून दिले आहे की, संहितेनुसार तपासात अनेक पैलू आणि टप्पे येतात आणि शेवटी पोलिसांनी समाविष्ट केलेल्या आणि संकलित केलेल्या सामग्रीवर, न्यायचौकशीला पाठवण्यासाठी आरोपीविरुद्ध गुन्हा शाबीत होतो की नाही याविषयी मत तयार करून संपते आणि दोषारोपपत्र किंवा अंतिम अहवाल सादर करणे हे अभिप्रायाच्या स्वरूपावर अवलंबून असते. आधी सांगितल्याप्रमाणे,

पोलिसांनी हे मत तयार करणे हे तपासातील अंतिम पाऊल आहे आणि ते अंतिम पाऊल केवळ पोलिसांनीच उचलायचे आहे आणि इतर कोणत्याही प्राधिकरणाने उचलायचे नाही.

**२१.** या प्रश्नाचा दुसऱ्या दृष्टिकोनातूनही विचार केला जाऊ शकतो. समजा पोलीसांनी अहवाल म्हणजेच संहितेच्या कलम १७० च्या अंतर्गत दोषारोपपत्र पाठवले. जसे आम्ही आधीच निर्दशनास आणून दिले आहे कि, जेव्हा दंडाधिकारी या प्रकरणाचा न्यायालयीन पद्धतीने विचार करतात, तेव्हा ते अहवाल स्वीकारण्यास बांधील नसतात. परंतु, ते पोलिसांपेक्षा वेगळे मत तयार करून कलम १६९ अंतर्गत अंतिम अहवाल सादर करण्यास सांगू शकतात का? आमच्या मते, दंडाधिकाऱ्याना असा कोणताही अधिकार नाही. जर त्यांच्याकडे असा कोणताही अधिकार नाही, तर कायद्यानुसार, न्यायचौकशीसाठी पाठवण्यासाठी आरोपीविरुद्ध गुन्हा शाबीत होत नाही, असा अंतिम अहवाल पोलिसांनी सादर केला असताना पोलिसांना दोषारोपपत्र सादर करण्याचे आदेश देण्याचा अधिकार दंडाधिकाऱ्यांना नाही. दंडाधिकारी आणि पोलिसांची कार्ये पूर्णपणे भिन्न आहेत आणि जरी, आधी नमूद केलेल्या परिस्थितीत, दंडाधिकारी अहवाल स्वीकारू शकतात किंवा नाहीत आणि कायद्यानुसार योग्य ती कारवाई करू शकतात, तरी, पोलिसांच्या अधिकारक्षेत्राचे उल्लंघन ते करू शकत नाही आणि पोलिसांना त्यांच्या मतानुसार बदल करण्यास भाग पाडू शकत नाही.

**२२.** म्हणून, निष्कर्ष काढण्यासाठी, जेव्हा पोलिसांनी, संहितेच्या कलम १६९ अंतर्गत, आरोपी विरुद्ध गुन्हा शाबीत होत नाही, असा अंतिम अहवाल सादर केला असताना, पोलिसांना दोषारोपपत्र सादर करण्याचे आदेश देण्याचा स्पष्टपणे किंवा अप्रत्यक्षपणे, अधिकार दंडाधिकाऱ्यांना नाही.

**२३.** या दोन याचिकांमध्ये आणखी एका गोष्टीची नोंद घ्यावी लागेल. दंडाधिकाऱ्यांनी या प्रत्येक प्रकरणात ,संबंधित उत्तरवादींनी दाखल केलेल्या निषेध याचिकांना तक्रारी म्हणून म्हणून ग्राह्य धरले आहे की नाही हे फारसे स्पष्ट होत नाही, कारण दंडाधिकाऱ्यांनी एखाद्या गुन्ह्याची दखल घेताना, त्याच्याकडे केलेल्या तक्रारीवर संहितेत नमूद केलेली योग्य प्रक्रिया अवलंबल्याचे आम्हाला आढळले नाही. त्यामुळे, या प्रत्येक प्रकरणात, पोलिसांना दोषारोपपत्र दाखल करण्याचे निर्देश देणे हे दंडाधिकाराच्या अधिकार क्षेत्राबाहेरचे आहे असे सांगून, आम्ही हे स्पष्ट करतो की, संबंधित निषेध याचिकांना तक्रारी म्हणून ग्राह्य धरणे आणि ह्या न्यायनिर्णयात आम्ही व्यक्त केलेल्या मतांच्या संदर्भात, कायद्यानुसार पुढील कार्यवाही करणे दंडाधिकाऱ्यांसाठी स्वेच्छातीत आहे.

**२४.** अपीलकर्त्यांचे विद्वान वकील श्री. नुरुद्दीन अहमद यांनी फौजदारी अपील क्रमांक २३८/१९६६ मध्ये त्यांच्या पक्षकारांचा बाबतीत पुढील कार्यवाही सुरू ठेवण्याचे निर्देश देणे अनावश्यक असल्याचे विशेष आवाहन केले आहे. विद्वान वकिलांनी निदर्शनास आणून दिले की दंडाधिकारी ह्यांच्या समोरील पोलिस अहवालात स्पष्टपणे दिसून येते की ज्या मुली बद्दल खटला आहे तिचे वय १९ वर्षांवरील असल्याचे सांगण्यात आले आहे, तिने स्वतःच असे म्हटले आहे की ती स्वतःहून पळून गेली आहे आणि तसे असल्यास, त्याचे पक्षकारा विरुद्ध पुढील कार्यवाही करणे अनावश्यक आहे. आम्ही विद्वान वकिलाच्या या युक्तिवादास स्वीकारण्यास इच्छुक नाही. एखादा गुन्हा घडला आहे की नाही किंवा अपीलकर्त्यांपैकी कोणी किंवा दोघेही त्यांच्यावर ज्या गुन्ह्यांचा आरोप केला जाऊ शकतो त्या गुन्ह्यांसाठी दोषी आहेत की नाही, या सर्व बाबींवर या टप्प्यावर, या न्यायालयाने विचार करण्याची आवश्यकता नाही.

**२५.** परिणामी, वरील निर्देशांच्या अधीन राहून, पोलिसांना दोषारोपपत्र दाखल करण्याचे निर्देश देणारे दंडाधिकाऱ्यांचे आदेश रद्द ठरवले जातील आणि त्या मर्यादेपर्यंत याचिकांना परवानगी दिली जाईल.

**२६.** अपिल मंजूर.

**अस्वीकरण**

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल".

x-x-x-x